Impact Factor-8.575 (SJIF)
ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

December-2022

ISSUE No - (CCCLXXX.) 380-B

## 75 Years of Indian Economy: Opportunities and Challenges




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor
Dr. M.N. Kolpuke
Principal
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga Dist. Latur

Editor
Dr.Shesherao S. Devnalkar
Head, Department of Economics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga Dist. Latur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | | |
|---|---|---|---|
| 20 | सेंद्रिय खताचा वापर शेतकऱ्यांसाठी फलदायी | प्रा.डॉ.बी.आर.शिंदे | 78 |
| 21 | स्वातंत्र्यानंतर भारतातील ग्रामीण स्थलांतराची कारणे, परिणाम व त्यावरील उपाय | डॉ.एम.डी.कच्छवे | 81 |
| 22 | भरडधान्ये उत्पादन आणि आहारातील महत्व | प्रा. डॉ. पाते शिवाजी बाबुराव | 85 |
| 23 | भारतातील दारिद्र्याची समस्या व उपाय | डॉ. अशोक टिपरसे नागेश रामदास पतंगे | 90 |
| 24 | महाराष्ट्राच्या आर्थिक विकासातील प्रादेशिक असमतोल | डॉ.सुनिता लिंबराज गुजर | 96 |
| 25 | भारतीय अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणाचे परिणाम | डॉ. बालाजी तुळशिराम घुटे | 99 |
| 26 | भारताच्या दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमावर दृष्टिक्षेप | प्रा बालासाहेब शिवाजी पवार | 103 |
| 27 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीची भूमिका | प्रा.डॉ. मौलाना महेताब सय्यद | 106 |
| 28 | जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था | रविकुमार चंद्रकांत माने | 110 |
| 29 | भारतातीललोकसंख्या, दारिद्रय आणि बेरोजगारीचा प्रश्न | प्रा.डॉ. खोकले आर. के. | 114 |
| 30 | डिजीटल चलन आणि आभासी चलन एक विहंगावलोकन | प्रा डॉ. डी. बी. कोनाळे | 120 |
| 31 | वर्तमान काळातील शेती क्षेत्राचे आंतरराष्ट्रीय व्यापारिक योगदान | प्रभाकर वसंत पगारे, डॉ. अजय वासुदेव काटे | 125 |
| 32 | अकरावी पंचवार्षिक योजना - एक दृष्टीक्षेप | प्रा.डॉ.पलमंटे माधव पांडूरंगराव | 130 |
| 33 | भारतातील पंचवार्षिक योजनांचा आढावा | प्रा.डॉ.संजय काळे | 136 |
| 34 | भारतातील दारिद्र्य – एक जटील समस्या | प्रा.शशिकांत दिवाण भामरे | 140 |
| 35 | शेती आणि भारतीय अर्थव्यवस्था | प्रा डॉ. डी. पी. कांबळे | 146 |
| 36 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीची भूमिका | प्रा. कांबळे शिल्पा बळीराम | 148 |
| 37 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीची भूमिका | प्रा. डॉ. पवार एस.व्ही. | 150 |
| 38 | भारतातील बँकाच्या राष्ट्रीयीकरणाची 50 वर्षे: सद्यस्थिती व भवितव्य | डॉ. प्रा.सौ. मंडले एस.यु | 155 |
| 39 | भारतीय स्वातंत्र्याचे 75 वर्ष व भारतातील मूलभूत सुविधांचा विकास | प्रा.अमोल अरुण पगार , डॉ.विकास विनायकराव सुकाळे | 162 |
| 40 | भारतातील दारिद्र्याचा प्रश्न आणि अनुसूचित जाती-जमाती एक विश्लेषण | प्रा.डॉ.एल.एच. पाटील | 166 |
| 41 | आत्मनिर्भर भारत : चुनौतियाँ और समाधान | प्रा.डॉ.रामकिशन मांजरे | 172 |

# भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीची भूमिका

प्रा. कांबळे शिल्पा बळीराम
महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा वाणिज्य विभाग

**प्रस्तावना :-**

जगातील प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासात कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्राचे स्थान निश्चितच महत्वाचे राहिले आहे.वरीपैकी कोणत्याही एकाक्षेत्राचा विकास म्हणजे त्या देशाचा आर्थिक विकास असे विकसित देशांच्या बाबतीत घडलेले नाही. विशेषत: शेती आणि उद्योग दोन्हीक्षेत्र आर्थिक विकासाच्या दृष्टिने एकमेकांस पर्यायीठरू शकत नाहीत. तरही एक मेकास पूरकचठरतात.या ठिकाणीकृषी आणि उद्योगक्षेत्राची नेमकी भूमिका.काय आहेहेस्पष्टकरण्याचा प्रयत्न केला आहे विकासात विशेषता भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासात या दोन्हीक्षेत्राचे स्थान काय आहे.याची चर्चा या ठिकाणीकरण्यात आली आहे.

देशाच्या आर्थिक विकासासाठी औद्योगिकरण कितीही महत्त्वाचे असलेतरी, ते शेती शिवाय कोणत्याही देशालाशक्य होत नाही.भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असणाऱ्या विकसनशिल देशामध्येकृषीक्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील स्थान अतिशय महत्त्वाचे आहे.म्हणुनकृषिला भारतीय अर्थव्यवस्था कणा असे म्हटले आहे.जवळपास 60 % लोकांना रोजगार पुरविण्याचे कार्य शेतीक्षेत्रकरित असले.

**शोध निबंधाचे अद्दिष्टे :-**

➤ भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषीची भूमीका अभ्यासणे.

➤ आंतरराष्ट्रीय व्यापारातील कृषीची भुमीका अभ्यासणे.

➤ राष्ट्रीय उत्पन्नातीलकृषीचा वाटा.

**संशोधनाचीग्रहितके :-**

भारतीय कृषीक्षेत्राचा विकास होवु शकतो.

**संशोधन पध्दती :-**

सदर प्रस्तुत निबंधासाठी दुय्यम संशोधन पध्दतीचा उपयोगकरण्यात आला आहे.यामध्ये संदर्भग्रंथ लिखित साहित्य वर्तमानपत्रे, मासिके इत्यादीचा उपयोगकरण्यात आला आले.

आर्थिक विकासातील कृषीची भूमिका :-

**1) वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा :-**

अन्नधान्य ही मानवाची प्राथमिकगरज आहे.भारतासारख्या विकसनशिल देशामध्ये लोकसंख्या दिवसेंदिवस आधीक वेगाने वाढत आहे.अशा वाढत्या लोकसंख्या अन्नधान्य पुरवठा करण्याचेकार्य शेतीक्षेत्रकरित असते.1967-68 पुर्वीभारताला अन्नधान्याचा बाबतीत इतर देशावर अवलंबून रहावे लागत होते.1967-68 मध्ये भारतात हरीतक्रांती घडुन आली आणि कृषी उत्पादनात प्रचंड वाढ झाली तेव्हा भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला.

**2) उद्योगक्षेत्रालाकच्यामालाचा पुरवठा :-**

कृषीक्षेत्राच्या विकासाबरोबरच उद्योगक्षेत्राच्या विकासावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो.भारतातील महत्वाचा विविध उद्योगांनाकच्चा माल पुरविण्याचे कार्यकृषिक्षेत्रकरीत असते.कृषीक्षेत्रामधून जेवढा ऊस, कापूस, ताग या सारख्याकच्चा माल अधिक उत्पादितहोतो.तेवढा साखर उद्योग, कापड उद्योग व ताग उद्योगांना आपल्या विकासासाठी कृषीसासाठी कृषीक्षेत्रांवर अवलंबून रहावे लागते.

**3) उत्पादक रोजगार मिळवून देणे.**

भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असणाऱ्या देशामध्ये वाढला लोकसंख्येला उत्पादक स्वरूपाचा रोजगार मिळवुन देण्याचेकार्यकृषीक्षेत्रकरीत असते.म्हणुन रोजगार मिळवूण देण्यातकृषीक्षेत्राचे योगदान निश्चितच महत्वाचे आहे. जेवढा रोजगारकृषीक्षेत्रातनिर्माण होतो. तेवढा रोजगार इतरकोणत्याहीक्षेत्रात निर्माण होत नाही.

**आंतरराष्ट्रय व्यापारातील कृषीची भूमिका :-**

भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात कृषिची भूमिका अत्यंत महत्वाची आहे.भारतामधून चहा, साखर, तंबाखू मसाले आणि तेलबिया इ. ची मोठ्याप्रमाणात निर्माण होते.भारताच्या एकुण निर्यातीमध्येकृषि उत्पादनाचा निर्यातीचा वाटा 50% इतकाहोता.तसेच 20% निर्यात हीकृषि आधारित उद्योगातूनहोतहोती. उदा:- भाजीपाला, प्रक्रियाकेलेली फळे, जूट, कापडसाखर इत्यादी. थोडक्यात 1950-51 मध्ये जी भारताची एकूण निर्यात होतहोती त्या निर्यातीमध्ये 70% वाटा कृषि उत्पादनाचाहोता.परंतू 1990-91 पासून जे निर्यातीमध्ये बदल झाले तेव्हा.

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXX.) 380 - B
ISSN : 2278-9308
December, 2022

भारताच्या एकूण निर्यातीतकृषीक्षेत्राचा वाटा कमीहोऊनतो 19.5% झाला आणि 1996-97 मध्ये 20.3% पर्यंत वाढला.परंतु 2011-12 या वर्षांचा विचार केल्यास भारताच्या एकूण निर्यातीलकृषीक्षेत्राचा वाटा घटूनतो 12.3 % झाला.हे प्रमाण जरी घटले असलेतरी निर्यात मुल्य मात्र 1990-91 ते 2011-12 या कालावधीत 6013 कोटी रुपयावरून 1,80,279कोटी रु. पर्यंत वाढले आहे.म्हणजेकृषीक्षेत्रामुळे भारताला विदेशी चलनाची प्राप्ती झाली आहे. जेवढे विदेशी चलन अधीक, तेवढा देशाचा आर्थिकविकास अधिकहोतो.

**आर्थिक नियोजनातीलकृषीची भूमिका**

आर्थिक नियोजनातीलकृषीचे महत्त्व वेगवेगळ्या माध्यमानेस्पष्टहोते जसेदेशाच्या निर्यात वाढीसाठी कृषीक्षेत्रचकरीत असते.कृषीक्षेत्रहे भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्वाचा आधार आहे.प्रत्येक पंचवार्षीक योजनेतकृषी विकासाच्या आराखडातयारकेला जातो.म्हणजेकृषीशिवाय नियोजनकरणेहे भारताला शक्य नाही.कृषी विकास हाच योजनांचा केंद्रबिंदू असतो.यावरून देखील भारताच्या नियोजनातकृषीक्षेत्राचे स्थान काय आहेहे आपल्या लक्षात येते.

**राष्ट्रीय उत्पन्नातीलकृषीचा वाटा :-**

1950-51 मध्येसकल घरगुती उत्पादनातकृषिक्षेत्राचे शेकडा प्रमाण 56.5% होते.पुढे आर्थिक विकासासाठी भारताने पंचवार्षीक नियोजनाचा स्विकार केला.या पंचवार्षीक योजनेमध्ये उद्योगक्षेत्राच्या आणि सेवा क्षेत्राच्या विकासावर लक्षकेंद्रीत झाल्यामुळेकृषीक्षेत्रातीलसुधारणेकडे दुर्लक्ष झाले.परिणानी एकूणसकल घरगुती उत्पादनातीलकृषीक्षेत्राचा वाटा कमीकमीहोतगेला. जसे 1990-91 मध्ये असणारे 35% च प्रमाण 2012-13 मध्ये 13.6% झाले आहे. यावरून असेस्पष्टहोतेकी एकेकाळी राष्ट्रीय उत्पन्नातील सर्वाधिक असणाराकृषीचा वाटा नंतरच्या काळातसततपणे घटतगेला आणि राष्ट्रीय उत्पन्नातील उत्पादकीय व सेवाक्षेत्राचा वाटा वाढत गेला.कृषीक्षेत्राचा वाटा कमीकमी जरीहोतगेलातरी भारतीय शेतीचे महत्त्व मात्र कमीहोणार नाही.

**1) भांडवल निर्मिती मधील भूमिका :-**

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये भांडवलाचे प्रमाण खूपचकमी असते.भांडवलाअभावी विकासाच्या इतरक्षेत्रात गुंतवणूक करता येत नाही.परंतुकृषीहा भारतीय अर्थव्यस्थेतील सर्वांत मोठा व्यवसाय आहे.म्हणून भांडवल निर्मितीत शेतीची भूमिका महत्वाची ठरते.कारण इतरक्षेत्राच्या तुलनेतकृषीक्षेत्रातकमी गुंतवणूक करून शेतीची उत्पादकता वाढवता येते.

**2) उद्योगक्षेत्राला श्रमपुरवठा करणे :-**

देशातील उद्योगक्षेत्राचा विकास हा त्या क्षेत्रातील उद्योगालाहोणाऱ्या श्रमपुरवठ्यावर अवलंबून असतो.उद्योगक्षेत्राला जेवढा श्रमपुरवठा आधिकहोईलतेवढे औद्योगीकक्षेत्रातील उत्पादन अधीकहोईल. भारतामध्ये उद्योगक्षेत्राला श्रमपुरवठा करण्याचेकार्यशेतीक्षेत्रचकरीत असते.भारतासारख्या कृषीप्रधानदेशात शेतीची उत्पादकता वाढल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते.त्यामुळे कुंटूंबाचे पोषणकरण्यासाठी स्वत: घरातील सर्वच व्यक्तींना शेतीतकामकरण्याचीगरज भासणार नाही. तेव्हा शेतीमध्ये अतिरिक्त श्रमपुरवठा तयारहोतो.

**3) औद्योगीक उत्पादनासाठी बाजारपेठ :-**

भारतामध्ये बहुतांश लोकसंख्याग्रामीण भागात राहते. या लोकांचीक्रयशक्तीवाढली तरच उद्योगाच्या विकासाला चालना मिळते. कृषी उत्पादकता व उत्पादन वाढले तरचग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न वाढते.त्यामुळे शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या लोखंडी, नांगर ट्रॅक्टररासायनिकखते, पाईप, किटक नाशके, इंजिन यासारख्या औद्योगिक उत्पादनाची मागणी वाढते व वरील प्रकारच्या शेतीसाधनांचीनिर्मितीकरणाऱ्या उद्योगाच्या विकासाला चालणा मिळते

**4) किंमतस्थैर्यास मदत:-**

देशातीलकिंमत पातळीस्थैर्य असेलतरच आर्थिक विकास साध्य करणेसहज शक्य होणे.अन्नधान्याच्या किंमती पुरवठ्याअभावी जेव्हा भरमसाट वाढतात तेंव्हा सर्व सामान्य लोकांचे जीवन मानावर त्याचा विपरित परिणामहोतो.अशा परिस्थितीत शेतीची उत्पादकता वाढून आधिक उत्पादनकेल्यास शेत मालाचा पुरवठा वाढण्यास मदतहोते.पुरवठा वाढून किंमतीकमीहोतात.परिणामी देशातीलकिंमत पातळी नियंत्रणात ठेवता येते.

**सारांश :-**

सारांशरूपाने असे म्हणता येईलकी, भरतासारख्या कृषीप्रधान आणि विशेषत: ग्रामीण लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या देशातकृषीच्या विकासाशीवाय प्रगतीसाधने शक्य नाही. हे लक्षात घेऊन 11 व्या पंचवार्षिक योजनेतकृषी संबंधीत महत्वाची व्यूहरचना तयारकरण्यात आली या योजनेत 10 व्या योजनेत जोकृषीक्षेत्रातील आर्थिक वृध्दीचादरहोता त्यात दुपटीने वाढ करण्यात आलीकृषीक्षेत्रातील आर्थिक वृध्दीदराचे लक्ष 4 % करण्यात आलेकृषी प्रधान देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्याही आधीकचिंतेच बाब आहे. याकडेही शासनाने लक्ष देणेगरजेचे आहे.

**संदर्भग्रंथ :-**

1. ढंगले बी. डी भारतीय अर्थव्यवस्था अरूणा प्रकाशन लातूर.
2. कोंडेवार स्मिता भरतीय अर्थव्यवस्था अरूणा प्रकाशन लातूर
3. कुलकर्णी पी. आर भारतीय अर्थव्यवस्था विद्या बुक्स औरंगाबाद.
4. कोळंबे रंजन भारतीय अर्थव्यवस्था भगीरथ प्रकाशन पुणेजाने. 2019